# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि. १६/१०/२००६ रोजी तहकुब करण्यात आलेली व दि.१९/१०/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१३) इतिवृत्त**

**गुरूवार** दिनांक **१९ ऑक्टोबर २००६** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.४० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस प्र.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गवळी रविकांत काशिनाथ
3. श्री. गायकवाड दिलीप नारायण
4. सौ. दलाल लता श्रीनिवास
5. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
6. श्री. पांडे विनायक प्रभाकर
7. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
8. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
9. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
10. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
11. श्री. मो. जावेद मो. इसाक
12. श्री. सावंत मधुकर दामोधर
13. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
14. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**संवाद :**

श्री. विनायक पांडे : दिपावली व रमजन ईद निमित्त सर्वांना शुभेच्छा देतो. घाटी दवाखान्याच्या परीसरात रस्त्यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण झाल्याची बातमी कालच्या एका वृत्तपत्रात आलेली आहे. इतर ठिकाणी बांधकाम चालू असल्यास तेथे इमारत निरीक्षक वेळेवर पोहचतात.घाटी दवाखान्यासमोर भर रस्त्यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले असतांना प्रशासकीय विभागाने काय कार्यवाही केलेली आहे.

मा. सभापती : प्रशासकीय अधिकारी यांनी खूलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी : स. सदस्यांनी सुचना केल्या प्रमाणे घाटी दवाखान्यासमोरील रस्त्यावर असलेले अतिक्रमण दीड महिन्यापूर्वी काढण्यात आलेले होते. पुन्हा अतिक्रमण होवू नये याची जबाबदारी प्रशासनाने वार्ड अधिकारी यांचेकडे सोपविलेली आहे.

श्री. विनायक पांडे : वार्ड अधिकारी यांचेकडून प्रशासकीय अधिकारी यांनी या संबधी माहिती घेतलेली आहे का. तसेच जलना रोडवर राजद्वारा इमारतीच्या संदर्भातही वृत्तपत्रात आलेले होते. त्या बाबतीत काय कार्यवाही केली आहे.

प्रशासकीय अधिकारी :घाटी दवाखान्या समोरील अतिक्रमणाच्या बाबतीत माहिती घेतलेली नाही. राजद्वारा इमारतीच्या संदर्भात सध्या माहिती उपलब्ध नाही. पूढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

श्री. त्र्यंबक तुपे : अतिक्रमण झाले की नाही याचा खुलासा करावा.त्या ठिकाणचे अतिक्रमण काढल्यानंतर पून्हा तेथे अतिक्रमण झाले आहे किंवा काय याची माहिती वार्ड अधिकाऱ्याकडून प्रशासकीय विभागाने घेतलेली आहे का?

प्रशासकीय अधिकारी : घाटी दवाखान्यासमोरील अतिक्रमण दीड महिन्यापुर्वी काढले होते. तेथे पुन्हा अतिक्रमण होवू नये याची जबाबदारी वार्ड अधिकारी यांचेकडे सोपविलेली आहे.

मा. सभापती : सदर ठिकाणी पून्हा अतिक्रमण झाले आहे किंवा नाही या संबधी प्रशासकीय अधिकारी यांनी वार्ड अधिकारी यांचेकडे संपर्क करून त्वरीत माहिती घ्यावी.

सौ. लता दलाल : अतिक्रमण काढण्या बाबत प्रशासन ढिम्म आहे. जे अतिक्रमण करतात त्यांना प्रशासनाचा निश्चितपणे पांठिबा आहे यावर काय कार्यवाही करणार आहात.माहिती नाही असे सरळ उत्तर अधिकारी देतात हे योग्य नाही. शहरात एकूण किती अतिक्रमण झालेले आहे. वृत्तपत्रात अतिक्रमणाच्या बाबतीत छापून येते तरीही अधिकारी सांगतात माझ्याकडे माहिती नाही याचा अर्थ ते अधिकारी त्या पदावर काम करण्यास सक्षम नाही.असा अर्थ आम्ही काढायचा का.

मा. सभापती : वार्ड अधिकाऱ्याकडून माहिती घेणार आहे. माहिती घेवून पुन्हा सभागृहात संबधीत अधिकारी खुलासा करतील.

श्री. मो.जवेद मो. इसहाक : शहरात अनेक भागात कचरा साचलेला आहे. उचलल्या जत नाही. माजे विरोधी पक्ष नेता श्री.मीर हिदायत अली यांचे वार्डात कचरा पडलेला असून उचलला जत नाही त्यामुळे त्यांनी महानगरपालिकेसमोर कचरा आणून टाकला होता. स्वच्छतेचे खाजगीकरण केले जते. महानगरपालिकेचेही लेबर काम करतात तरीही कचरा उचलला जत नाही. या संबधी प्रशासनाकडून माहिती घेण्यात यावी.

मा. सभापती : या बाबत संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

उद्यान अधिक्षक : शहाबाजर भागात सकाळी कचरा उचलला जत होता.त्या दिवशी इतर ठिकाणी कचऱ्याचे प्रमाण जस्त झाल्यामूळे व सकाळी कचरा न उचलता दुपारी उचलण्यात आला. स.माजे विरोधी पक्षनेता यांचे असे म्हणणे होते की सकाळीच कचरा उचलला जवा. त्यामुळे त्यांनी येथे कचरा टाकला होता.

श्री.मो.जवेद मो.इसाक : सकाळी कचरा उचलल्या नंतर दुपार पर्यत इतका मोठा कचरा होवू शकत नाही एवढा कचरा येथे आणून टाकला होता.

मा. सभापती : कचरा उचलण्यास अडचण असेल तर तसा खुलासा करावा.

उद्यान अधिक्षक : अडचण काही नव्हती. सकाळी उचलण्या ऐवजी दूपारी कचरा उचलला होता. वेळेचा बदल झाला होता.

सौ. लता दलाल : शहरात अनेक ठिकाणी कचरा आहे. कचरा उचलला जत नाही त्यात दिरंगाई होते, घटां गाड्या आहेत का याचाही खुलासा करावा.

उद्यान अधिक्षक : नॉर्मस् प्रमाणे मागणी आहे. सध्या आहे त्यामध्ये कचरा उचलण्याचे काम चालू आहे.

सौ. लता दलाल : शहरातील दररोज किती कचरा निघतो. किती शिफ्ट मध्ये तो घेवून जतो व एका गाडीत किती कचरा नेला जतो. एकूण किती गाड्या आवश्यक आहेत. ही संपूर्ण माहिती दिली तर निश्चिपणे माहिती होईल, मार्ग काढता येईल.

उद्यान अधिक्षक : शहरात एकूण ३२५ ते ३५० टन कचरा दररोजचा जमा होतो.

सौ. लता दलाल : गाड्या कमी पडत असेल तर नवीन गाड्या खरेदीचा प्रस्ताव ठेवावा. महापालिकेच्या दिरगांईमूळे कमतरतेमूळे नागरीकांना त्रास होवू नये याची दखल घेण्यात यावी. अनेक वार्डात आजही घंटा गाड्यांची कमतरता आहे. त्यामुळे कचरा गोळा होत नाही. जमा झालेला कचरा उचलला जत नाही. खाजगीकरण झाले म्हणून कचरा पडून राहतो हे लोकांना कळू द्या. मुद्दामहून कचरा उचलण्यासाठी काही वाहनचालक गाडी घेवून जत नाही.

मा. सभापती : कचरा उचलण्यासाठी गाडया कमी असेल तसेच लेबर कमी असेल तर या बाबतीत नियोजन करून घेण्यात यावे. व येणाऱ्या सणामध्ये कूठेही कचरा पडून राहणार नाही याची संबधीत अधिकारी यांनी दखल घ्यावी.

श्री.मो.जवेद मो.इसहाक :शहरात डेंग्यूची साथ पसरलेली आहे. घाटी दवाखान्यात दोन डेग्यूचे रूग्ण आहे. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने या संबधी काय उपाययोजना केलेली आहे.

श्री. त्र्यबंक तुपे : डेग्यूचे रूग्ण आहेत का प्रतिबंधक उपाय म्हणून महानगरपालिकेने काय नियोजन केलेले आहे.

मा. सभापती : प्रतिबंधात्मक उपाय म्हणून काय कार्यवाही केलेली आहे याचा खूलासा करावा

प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी : १ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर पर्यत एकूण २०१६ तापाचे रूग्ण आढळून आलेले आहे. त्यात संशयीत डेग्यू म्हणून एकही रूग्ण नाही. खाजगी दवाखान्यात एक दोन ठिकाणी डेग्यूचे रूग्ण असल्याचे डॉक्टरांच्या रिपोर्ट नुसार सॅम्पल घेवून तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहे. मा.महापौर व मा. सभापती यांचेकडे सर्व संबधीत अधिकाऱ्याची बैठक घेण्यात आलेली आहे. त्यानूसार एक कृति आराखडा तयार करून त्याची अमलबजवणी करण्यात येत आहे. फोगींग व अबेट बध्दल झोन अधिकाऱ्याकडून नवीन कृति आराखडा तयार करून घेतला आहे.त्या प्रमाणे अंमबजवणी होत आहे.

श्री.मो.जवेद मो.इसहाक : शहरात एकाही वार्डात फॉगींग मशीनद्वारे औषधी फवारणी होत नाही. असेल तर त्याबाबत संबधीत वार्डाच्या नगरसेवकाला कल्पना दिलेली आहे का त्याची सही घेतलेली आहे.

प्रआरोग्य वैद्य.अधिकारी : फॉगींग बाबत वार्ड निहाय नियोजन केलेले आहे त्या कामावर वार्ड अधिकारी तसेच बॉयोलॉजेस्ट यांचे नियंत्रण असते. या बाबत जस्तीची माहिती डॉ. जीवणे या देवू शकतील. अबेटची फवारणी केली जते तसेच आरोग्य विभागाचे कर्मचाऱ्याकडूनही अबेट घरोघरी टाकणे सुरू केलेले आहे. डासाची उत्पत्ती नष्ट करण्याची मोहिम सूरू केलेली असून आरोग्य विभागामार्फत जलद ताप सर्वेक्षण करणे तसेच खाजगी डॉक्टर्सकडून रिपोर्टस् जमा करणेचे काम चालू आहे. तीन महिन्यापासून ही कार्यवाही करीत आहोत.

श्री. हिम्मतराव दाभाडे : माझ्या वार्डात आठ गृह निर्माण संस्था येतात. या वार्डात ४ कर्मचारी, आठ मजूर सफाईच्या कामासाठी असल्यामुळे संपूर्णत: स्वच्छतेचे काम होत नाही. आणखी ३

कर्मचारी व ३ स्त्री मजूर देण्यात यावे. एक महिन्यापासून वार्डात फवारणी झालेली नाही. कचरा उचलल्यानंतर त्या जगेवर पावडर टाकली जत असे, ती आता टाकली जत नाही.

डॉ. आशा बिनवडे : गेल्या काही महिन्यामध्ये फॉगींग तसेच स्प्रेयींग पंप मशीनची किती खरेदी केलेली आहे. जेअसेल त्याद्वारे कोणती औषधी स्प्रेयींग केली जते.

प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी : फॉगींग मशीन २० खरेदी केलेल्या असून स्प्रेयींग पंप मलेरीविभागा मार्फत खरेदी केलेली आहे.

बायोलॉजेस्ट :संचिका कार्यवाही अंतर्गत आहे. खरेदी झालेली नाही. जुने खराब झाली आहे. २५ पाहिजेत, २० खराब आहे, ३० स्पेयींग पंप आहेत. बीजेक्स, बॅक्टीसाईज ,एमएल ऑईल फवारणी करतो. ऑगस्टपासून नोव्हान हे औषध बंद केलेले आहे.२६.६.२००६ पासून कार्यवाही करीत आहेत अद्याप पंप मिळालेले नाही.

डॉ.आशा बिनवडे : नोव्हान या औषधाची मागील वर्षी किती डिमांड केलेली होती.

जीवशास्त्रज्ञ प्रमुख : नोव्हान ची खरेदी भांडार विभागाकडून होते. या विभागाकडून डिमांड केली जत असे आता ते बंद केलेले आहे.

डॉ. आशा बिनवडे :या वर्षी सुध्दा नोव्हान बंद केले असतांना ८०० लिटरची डिमांड केलेली होती. याचे कारण काय ?

प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी : ८०० लिटर नोव्हानची डिमांड केलेली होती परंतू आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे जेंव्हा या संबधीची संचिका आली त्यास तुर्त स्थगिती देण्यात आलेली आहे.त्या ऐवजे डेल्टामॅथन हे जस्त इफेक्टयूव असलेले औषधाची मागणी केली. नोव्हान खरेदी करीत नाही.डेल्टामॅथन प्रायोगिक तत्वावर घेणार आहोत. सक्सेस झाले तर पुर्ण शहरासाठी हे औषधी फवारणी होईल.

सौ. लता दलाल : स्पेकच्या सर्वेक्षणाच्या संदर्भात कमेटी नियुक्ती केलेली होती त्या कमेटीत स. सदस्य श्री. तुपे श्री. गवळी तसेच माझी निवड केलेली होती. या संदर्भात आम्ही करमूल्य निर्धारक व संकलक यांचेकडे वारवांर गेलो, माहिती दिली नाही. किती मालमत्ता आहेत, किती लोकांना नोटीसेस दिल्या किती प्रकरणात सुनावणी झाली व कमी जस्त कर कोणत्या मालमत्तेचे करण्यात आले या बध्दल अदयाप माहिती दिलेली नाही. सुनावणीच्या वेळी आम्हाला बोलविण्यात आले नाही. तोंडी माहिती दिली जते. यात प्रशासन काही तरी दडवतय असे वाटते. स्पेक कपंनीला सर्वेचे काम दिले. त्यांना महानगरपालिकेने कार्यालय दिले. त्याचे भाडे तसेच लाईट बील वसूल केले जते का आजही शहरात ३० हजर मालमत्ता अशा आहेत की त्याची करआकारणी ज्या त्या ठिकाणी झालेली नाही. माहिती दिली नाही. लेखी माहिती आम्हा सदस्यांना देण्यात यावी.आम्ही काय अहवाल देणार.

श्री. त्र्यंबक तुपे : वॉर्ड कार्यालयात सुनावणी होऊन तेथेच तडजेड होते. साईटवर कोणी जत नाही. हे बरोबर नाही.

सौ. लता दलाल : मोठमोठया हॉटेल, कमर्शियल इमारती तसेच मोठमोठया कंपन्या आहेत त्याची कर आकारणी अद्याप झालेली नाही. याचाही खूलासा करण्यात यावा.

श्री. दिलीप गायकवाड : देवगिरी कॉलेज तसेच बजज हॉस्पीटल ला किती कर आकारणी केलेली आहे याचा खूलासा घेण्यात यावा. किती टॅक्स कमी केलेला आहे.

मा. सभापती : स्पेक एजन्सीच्या संदर्भात जे प्रश्न सदस्यांनी उपस्थित केलात्या संबधी खुलासा करावा.

करमुल्य निर्धा.व संकलक : स्पेकच्या संदर्भात जी समिती नियुक्त केली होती त्या समितीतील सर्व सदस्यांना सप्टेबरमध्ये तसे पत्र दिलेले होते. वार्डवाईज कोणत्यातारखेला कूठे सुनावणी होणार आहे या संबधी सुध्दा माहिती दिलेली आहे. मागिल एक महिन्यापासून मी आजरी होतो तसेच या महिण्यात अतिरिक्त चार्ज असल्यामुळे वार्डमध्ये जणे शक्य झाले नाही. दिवाळीनंतर वॉर्डवाईजसुनावणी घेण्यात येईल.

श्री. त्र्यबंक तुपे : सुनवणीनंतर किती व कोणत्या मालमत्तेचा कर कमी केला याची लेखी वॉर्डनिहाय माहिती सदस्यांना देण्यात यावी.

मा. सभापती : आतापर्यत स्पेक एजन्सीला सर्वेचे काम दिल्यानंतर सुनावणीच्या किती नोटीसेस दिल्या व मालमत्ता कराच्या संदर्भात किती प्रकरणे वादग्रस्त आहे. किती पव्रकरणाची सुनावणी घेतली व तडजेड करून निर्णय घेतला.उर्वरीत मालमत्तेच्या संदर्भात सुनावणी केंव्हा घेणार आहात. याची माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी.

सौ. लता दलाल :स्पेक या एजन्सील किती दिवसाची मूदत दिली होती. ती संपलेली आहे की नाही. आणखी किती कालावधीसाठी मुदतवाढ दिलेली आहे याचीही माहिती द्यावी.

मा. सभापती : याचाही त्यात अंतर्भाव करावा व माहिती सादर करावी.स.सदस्य श्री. दिलीप गायकवाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचा खुलासा करावा.

करमुल्य निर्धा.व संकलक : बजज हॉस्पीटलला १०.५२एवढा कर लागलेला आहे. देवगिरी कॉलेज नविन इमारत ८ लाखा संबधी माहिती नाही. देवगिरी कॉलेजची नवीन इमारत आहे त्यास आठ लक्ष इतका टॅकस आकारण्यात आलेला आहे. नियमानूसार जे कर आकारला आहे तो ठेवला आहे कमी केलेला नाही मा.आयुक्तांकडे सुनावणीसाठी ते प्रकरण आहे.

श्री. विनायक पांडे : राजतारा या इमारतीच्या संदर्भात माहिती मागवली होती संबधीत अधिकारी आलेले आहे.

प्रशासकीय अधिकारी :वार्ड अधिकारी यांना दूरध्वनीवरून संपर्क साधला असता त्याचे म्हणण्यानूसार घाटी येथील परीसरात पून्हा अतिक्रमण झालेले आहे. सदरील अतिक्रमण पोलीस बदोबस्त घेवून १५ ते २० दिवसात काढण्यात येईल.राजतारा इमारतीच्या संदर्भात पूढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात येईल.

श्री.त्र्यंबक तुपे : अतिक्रमण हटाव मोहिम राबवून खर्च करायचा व पून्हा त्या जगेवर अतिक्रमण होत असेल तर जेअधिकारी जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा. सभापती : वार्ड अधिकारी यांनाही सूचना करण्यात येते की जर ज्या ज्या भागात अतिक्रमण झालेले आहे. ते काढण्यासाठी कार्यवाही करावी. पुन्हा अतिक्रमण झाल्यास वार्ड अधिकारी यांना जबाबदार राहतील.ज्या ज्या ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे ते काढण्याची कार्यवाही त्वरीत करावी.

श्री.मो.जवेद मो.इसाक : पुंडलिकनगर भागात पाणी देण्यात आले दोन दिवसापूर्वीच त्या निमित्ताने उद्घाटन करण्यात आले. सदर वसाहत ही अनधिकृत वसाहत आहे गुंठेवारीत येतो अशा शहरात किती वसाहती आहे त्यांनाही पाणी पुरविणार आहात का याचाही खुलासा करावा.

शहर अभियंता : पुंडलिकनगर हा गुंठेवारी भाग येतो पूर्वी ५ ते ६ वर्षापासून १२ गल्ल्यामध्ये पाणी देत होतो. या गल्ल्यांना तसेच गुंठेवारीत जे जे भाग रेग्यूलर होईल त्या भागात पाणी दिले जणार आहे.

श्री.मो.जवेद मो. इसहाक : जेपाणी सोडण्यात आले ते कूठे वाटप केले जते.

शहर अभियंता : पूर्वी १२ गल्ल्यांना इतर टाकी वरून पाणी पुरवठा केला जत असे तो बंद करून जे पूंडलिकनगर भागासाठी क्रॉस कनेक्शन घेण्यात आले त्या टॉकीतून आता १२ गल्ल्यांना पाणी देण्यात येणार आहे तसेच ज्या लोकांनी गुठेवारी करून घेतले त्यांना नळ कनेक्शन देणार आहोत. १२ गल्ल्याही गुंठेवारीमध्ये येतात. अगोदरपासून या भागात पाणी दिले जत आहे. अनेक ठिकाणी गुंठेवारी भागात यापूर्वी पाणी दिले गेले आहे.

श्री. विनायक पांडे : दिपावली व रमजन ईद निमित्त शहरात कोणत्याही भागात पिण्याची पाण्याची टंचाई होवू नये याची दखल घेण्यात यावी.आठ दिवसापासून माझ्या वार्डात पाणीपूरवठा विस्कळीत झालेला आहे.

श्री. हिम्मतराव दाभाडे : मुथियान कॉर्नर येथे महानगरपालिकेची खूली जगा आहे. त्या जगेवर संरक्षित भिंत केलेली असून सदर भिंत माधवराव घोरपडे यांनी तोडून अतिक्रमण केलेले आहे. या बाबतीत खूलासा करण्यात यावा.

प्रशासकीय अधिकारी :श्री. घोरपडे यांना नगररचना विभागाने बांधकाम परवानगी दिलेली होती. त्यानंतर पून्हा नगररचना विभागानेच बांधकामास स्थगिती दिली. संरक्षित भिंत तोडली असे स. सदस्यांनी म्हटले त्या संदर्भात सध्या माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही.

श्री.हिम्मतराव दाभाडे : बाजूला असलेल्या टपऱ्या काढण्यात आल्या त्यावेळी झालेले अतिक्रमण अधिकाऱ्याना निदर्शनास आले नाही का? याची माहिती संबधीतांना दिलेली आहे का?

मा.सभापती : प्रशासकीय अधिकारी यांनी स्वत: तेथे जवून पाहणी करावी व संरक्षित भिंत तोडली असेल तर संबधीत विभागास कळवावे. त्याची एक प्रत माझ्याकडे द्यावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : सर्वे नं. ६ मध्ये १९८६ संबधीत व्यक्तीने ३,०६,०००/-इतकी रक्कम घेतलेली आहे. १९८३ रेकॉर्ड पाहिजेआहे. या संबधीची संपूर्ण माहिती पूढील बैठकीत देण्याचे सूचना कराव्यात.

श्री.साहेबराव कावडे : पुंडलिकनगर हा गुंठेवारी असलेला भागात पिण्याचे पाणी सोडण्यात आले. महापालिकेचा तेथे खर्च झाला आहे. त्याबध्दल आम्हा सर्वांना आनंद आहे. त्या प्रमाणेच माझ्याही वार्डात गुंठेवारीचा भाग येतो.अनेक वेळा या भागात विकास कामे करण्या संदर्भात सुचना मांडतो परंतू गुंठेवारीचे रेग्युलर झाल्याशिवाय सुविधा देता येणार नाही अशी उत्तरे दिली जते.

मा. सभापती : गुंठेवारीत जेघर रेग्यूलर होईल त्यांनाच पाणी दिले जणार आहे.

श्री. साहेबराव कावडे : किमान गुंठेवारी भागात पिण्याचे पाणी देण्यात यावे . नागरीक गुंठेवारीत येण्यात तयार होतील.

मा. सभापती : सर्व सदस्यांना विनंती की गुंठेवारी रेग्यूलाईजकरण्यासाठी सर्व नागरीकांना आपणच आवाहन करावे . त्यांनी पैसे भरले तर त्या भागात सुविधा देता येतील.

श्री. त्र्यंबक तुपे : ज्या ज्या भागातून गुंठेवारीची रक्कम जमा झाली असेल त्या त्या भागात विकास कामासाठी ती रक्कम खर्च करण्यात यावी. मा. आयुक्तांनी हे मान्य केले होते.

मा. सभापती : किमान ८० टक्के भाग हा गुठेंवारीत आला पाहिजे तरच त्या भागात कामे करता येतील. नागरीकामध्ये जगजगृती निर्माण करावे आपल्या सर्वाचे ते कर्तव्य आहे. सुविधा देता येतील यासाठी प्रयत्न करावे.

श्री.मधुकर सावंत : गुंठेवारी संदर्भात शासनाचे जेनिर्देश आहे त्यात ज्या भागातून रक्कम जमा होईल त्या जमा झालेल्या रक्कमेच्या ९५ टक्के रक्कम खर्च करता येईल. ८० टक्के गुंठैवारी भाग रेग्यूलर झाल्यानंतरच काम करावे असे कुठेही म्हटलेले नाही.

मा. सभापती : शहर अभियंता यांनी या संदर्भात खूलासा करावा.

शहर अभियंता : गुंठेवारी भागात जेवढी रक्कम जमा होईल त्याचे ८५ टक्के रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करून काम करता येईल.

मा. सभापती : ज्या ज्या भागातून गुंठेवारीच्या माध्यमातून वसूली झालेली आहे त्या त्या भागात नियमानूसार विकास कामे करण्याची कार्यवाही करावी.

श्री. दिलीप गायकवाड : अधिक्षक अभियंता श्री. सोनी साहेब यांनी त्याचे जन्मतारखेच्या दाखल्यावर खाडाखोड केलेली आहे अशी माझी माहिती आहे. या बाबतीत खुलासा घ्यावा.

मा. सभापती : संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

सहा.आयुक्त -१ : शहर अभियंता श्री. सोनी साहेब यांचे सेवापटामध्ये जन्मतारखेत कोठेही खाडाखोड, दुरूस्ती केली नाही. दि. २०.१०.१९४९ ही त्यांची जन्म तारीख आहे.

श्री. विनायक पांडे : जे शारीरिक शिक्षक तसेच क्रिडा शिक्षक काम करतात त्यांचे संदर्भात एक शासन निर्णय आलेला आहे. क्रिडा व युवक सेवा संचालनाच्या अस्थापनेवरील शारीरिक शिक्षक निदेशक गट - ब या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर क्रिडा व युवक संचालनायच्या प्रशासकीय व तांत्रिक कामामध्ये सहाय्य करण्याची जबाबदारी देण्यात आलेली आहे. या पदाची कर्तव्य व जबाबदारी लक्षात घेता या पदाच्या पदनामामध्ये क्रिडा अधिकारी असा बदल करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे. महानगरपालिकेच्या मार्फतच सध्या जिल्हा क्रिडा कार्यालय तसेच महानगरपालिकेचा क्रिडा विभाग या संपूर्ण त: या मार्फत ८ ते १२ पर्यतच्या विदयार्थ्याचा संघ निवडला जत आहे. एक ग्रामिण व महानगरपालिका शहर अशा दोन संघाची निवड होते. महानगरपालिकेच्या शारीरिक शिक्षकाच्या पदनामा मध्ये बदल करून त्यांनाही क्रीडा अधिकारी असे संबोधण्यात यावे.

मा. सभापती : शासनाची या संबधी जर नियमावली उपलब्ध असेल तर त्याचाअभ्यास करून प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.हिम्मतरावदाभाडे : प्रकल्प विभाग मध्ये ७ कर्मचारी अस्थायी म्हणून कार्यरत आहे त्यांना मुदतवाढ देण्यात आलेली नाही ३ महिण्यापासून त्यांना पगार मिळत नाही. त्यांना मुदतवाढ देण्यात यावी.

मा. सभापती : प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. विषय क्र११८ ते १२१ या विषयांना मंजूरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.118 :</u>**

दिनांक **14/9/2006**(का.प.क्र.11) व **22/9/2006**(का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक **14/9/2006** व **22/9/2006** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.119 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.24 चिकलठाणा एमआयडीसी अंतर्गत एन-1 भागात रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.14,48,650/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2006-2007 या आर्थिक वर्षात पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार असून त्याकरीता आर्थिक तरतूद उपलब्ध आहे.

तरी रूपये 14,48,650/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.24 चिकलठाणा एमआयडीसी अंतर्गत एन-1 भागात रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.14,48,650/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.120 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.72 अंतर्गत मुख्य रस्त्यावर फुटपाथ बांधणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन 2005-2006 च्या दरसुची नुसार र.रु.11,89,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षात नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेला असून कामावरील आर्थिक तरतुद उपलब्ध आहे.

तरी रु.11,89,000/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.72 अंतर्गत मुख्य रस्त्यावर फुटपाथ बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,89,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.121 :**

कार्यकारी अभियंता (विद्रेइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.93 रचनाकार कॉलनी स्टेशन रोड मनपाच्या खुल्या जागेत बहुउद्देशीय हॉल बांधणे व परिसर विकसीत करणेच्या कामाकरीता सा.बां.विभागाच्या सन 2005-06 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.14,81,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2006-07 अंतर्गत अर्थसंकल्प पुस्तिका पान क्र.W-182 अ.क्र.3 व्यापारी संकुले व उर्वरीत इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल.

त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक रू.14,81,000/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.93 रचनाकार कॉलनी स्टेशन रोड मनपाच्या खुल्या जागेत बहुउद्देशीय हॉल बांधणे व परिसर विकसीत करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.14,81,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.122 :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले आहे. पुर्वी सिडको कार्यालयामार्फत विविध जाहिरात एजन्सी धारकांकडून जाहिरात कर वसूल करण्यात येत होता. सिडको कार्यालयाचे महानगरपालिकेकडे हस्तांतर झाल्यानंतर सिडको क्षेत्रातील जाहीरात फलकाचे जाहीरात कर वसूल करणे करीता महानगरपालिकेतर्फे जाहीरात फलकाची निविदा मागविण्यात आली होती. त्यात एकूण दहा निविदा विक्री झाल्या होत्या. विक्री झालेल्या निविदापैकी एकही निविदा प्राप्त झालेली नाही. विविध जाहीरात एजन्सी धारकांकडून सिडको कार्यालयाने निश्चित केलेल्या जाहीरात कराच्या रक्कमेवर या कार्यालयातर्फे 25% जास्त शुल्क आकारून सन 2006-07 या वर्षासाठी जाहीरात कर वसूल करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी निविदा काढणेसाठी निविदा प्रक्रीयेमध्ये बराच कालावधी लागणार असल्याने निविदा काढणे शक्य होणार नाही. त्यामुळे सन 2006-07 या आर्थिक वर्षात संबंधीत जाहीरात एजन्सी धारकांकडून जाहीरात कर वसूल करणे व सन 2007-2008 या वर्षासाठी निविदा प्रक्रीया सुरू करणेस प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : एप्रिल २००६ पासून सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले. यापूवी सिडको होर्डीग्जवर कर आकारणी करीत असे. सिडको भागात एकूण किती होर्डीग्जव मालमत्तेचा सर्वे झालेला आहे का, घरावर किती होर्डीग्जलावण्यात आलेल्या आहे. दर कशा प्रकारे ठरविले आहे.

कर निर्धाकर व संकलक : हा विषय मालमत्ता विभागाच्या संबधीत आहे. पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

मा. सभापती : पुढील बैठकीत हा विषय ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.123 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिध्दार्थ उद्यान येथे भगवान गौतम बुध्दांची ध्यानस्थ मुद्रेतील मुर्ती बसविणे या कामासाठी अर्थसंकल्प 2006-07 अंतर्गत रक्कम रू.12.50 लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. करीता सिध्दार्थ उद्यान येथे भगवान गौतम बुध्दांची मुर्ती बसविणे करीता चौथरा बांधणे व परिसर विकसीत करणे करीताचे नकाशे तयार करणे, देखरेख करणे, आर.सी.सी.डिझाईन देणे करीता वास्तुतज्ञ श्री.विजय सांगवीकर यांचेकडून करून घेण्यास मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. दर अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 2% मोबदला द्यावा लागेल.

तरी सदरील कामाचे नकाशे (लँड स्केपींग, डिजाईन, विद्युतीकरणाचे नकाशे इ.) वास्तुतज्ञ श्री.विजय सांगवीकर यांचेकडून करून घेण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. रविकांत गवळी : गौतम बुध्दाची मूर्ती बसविण्याबाबत आमचे दुमत नाही. परंतू गेल्या दीड वर्षात असे पाच ते सहा विषय आलेले आहे. प्रत्येक ठरावात वेगवेगळे वास्तुविशारद यांची नावे येतात काहीना २ टक्के तर काहीना १.५ टक्का या प्रमाणे देतो एकूण वास्तूविशारद किती आहे. त्या वास्तुविशारदाची यादी घेण्यात यावी. त्यांचेकडून डिजईन घेण्यात यावे जेसलेक्ट होईल त्यांना काम देण्यात यावे.

मा. सभापती :शहर अभियंता यांना सूचना करण्यात येते की यापुढे अशा प्रकारच्या कामांसाठी आर्कीटेक्टचे एक पॅनल तयार करावे. त्यापैकी किमान पाच आर्कीटेक्टकडून डिजईन मागविण्यात यावे. ज्यांचे डिजईन मान्य होईल त्यांना १.५% प्रमाणे काम देण्यास हरकत नाही. यापुढे अशी कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी. सदरील प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे भगवान गौतम बुध्दांची मुर्ती बसविणे करीता चौथरा बांधणे व परिसर विकसीत करणे करीताचे नकाशे तयार करणे, देखरेख करणे, आर.सी.सी.डिझाईन देणे करीता वास्तुतज्ञ श्री.विजय सांगवीकर यांचेकडून करून घेण्यास तसेच त्यांना अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 2% मोबदला देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार यापुढे वास्तुतज्ञांचे एक पॅनल नियुक्त करावे, त्यांचेकडून ड्रॉइंग मागवून त्यातून ज्यांचे मान्य होईल त्यांचेकडून अशा प्रकारचे काम करून घेण्याची कार्यवाही अनुसरण्यात यावी.

**विषय क्र.124 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या नवीन फारोळा पंपगृह येथील एच.टी.पॅनल बोर्ड दुरूस्त करण्यासाठीच्या रू.13,99,377/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती सभेचा ठराव क्र.163 दि.4.1.2006 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

या कामासाठी वर्तमानपत्राद्वारे निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/85/06, दि.18-1-2006 अन्वये स्पर्धात्मक निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार निविदा विक्रीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत एकूण पाच निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेस तीन दर भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. मे.बडगुजर अँड कंपनी, नाशिक अं.प.दरापेक्षा 16% जास्त दराने
2. मे. रेणुका इले. कंपनी, औरंगाबाद अं.प.दरापेक्षा 25% जास्त दराने
3. मे.अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद अं.प.दरापेक्षा 36% जास्त दराने

सदरील दराची तुलना केली असता, मे.बडगुजर अँड कंपनी, नाशिक यांचे दर सर्वात कमी परंतु अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16% जास्त असल्याने मा.आयुक्तांनी अल्पमुदतीची फेरनिविदा करण्याचे आदेशीत केले. या आदेशानुसार वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/199/06, दिनांक 21-3-2006 अन्वये फेरनिविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार निविदा विक्रीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत तीन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या, त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. मे. रेणुका इले. कंपनी, औरंगाबाद अं.प.दरापेक्षा 42% जास्त दराने
2. मे.अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद अं.प.दरापेक्षा 42.5% जास्त दराने
3. .मे.बडगुजर अँड कंपनी, नाशिक अं.प.दरापेक्षा 55.60% जास्त दराने

या प्राप्त दराची तुलना केली असता मे.रेणुका इले.कंपनी, औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 42% जास्त आहेत. या जादा दराबाबत मे.रेणुका इले.कंपनी यांचेशी वाटाघाटी केल्यानंतर 42% जास्त दराच्या निविदेस मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे.

सदरील जास्त दराबाबत खुलासा करण्यात येतो की, या कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वर्ष 2005-2006 च्या यांत्रिकी/विद्युत दरसुची आधारे तयार करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता तथा अध्यक्ष, दरसुची समिती, पुणे यांनी त्यांचे

परिपत्रक क्रमांक मुअ(पुणे)/तांशा(यां)/3184/06, दिनांक 28-8-2006 अन्वये ट्रान्सफॉर्मर, मोटर्स व केबलच्या दरांमध्ये 25% ते 70% दरवाढ करण्यात आल्याचे कळविले आहे.

सदरची दरवाढ लक्षात घेता या कामासाठी मे.रेणुका इले. कंपनी यांचे 42% जास्त दराची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणेऔरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या नवीन फारोळा पंपगृह येथील एच.टी.पॅनल बोर्ड दुरूस्त करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा 42% जास्त दराची मे. रेणुका इलेक्ट्रीक कंपनी, औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.125 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने साठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रीयेत आवश्यक असणाऱ्या वार्षिक क्लोरीन गॅसच्या पुरवठ्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.21,61,250/- चे तयार करण्यात आले असून प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव सादर करण्याबाबत मा.आयुक्तांनी दि.22.9.2006 रोजी शिफारस केली आहे.

आर्थिक वर्ष 2006-07 च्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठा रसायने खरेदी करीता तरतूद करण्यात आली आहे. वर्ष 2006-07 मधील वार्षिक क्लोरीन गॅस खरेदीसाठी रूपये 21,61,250/- चे अंदाजपत्रक स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजने साठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रीयेत आवश्यक असणाऱ्या वार्षिक क्लोरीन गॅस खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.21,61,250/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.126 :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर सुधारीत मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्रमांक 23 प्राथमिक शाळेचे विस्तरीकरण या प्रस्तावाने न.भू.क्र.10262 मोहल्ला शहागंज ही संपूर्ण मिळकत बाधीत असून उक्त मिळकतीचे एकूण क्षेत्र 124 चौ.मी. असून सदर मिळकत अस्तित्वात असलेल्या शाळेलगत आहे.

उक्त मिळकतीचे क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादन करावयाचे असून उक्त मिळकतीच्या बाधीत क्षेत्राचा मोबदला सर्व वजावटी जाता रू.4,65,300/- (चार लाख पासष्ट हजार तीनशे फक्त) निश्चित केले असून बाधीत क्षेत्राचे खरेदीखताचा संपूर्ण खर्च मिळकतधारक करणार असून त्यासाठी रूपये 46,200/- खर्च अपेक्षित आहे उक्त खरेदीखताचा खर्च मिळकतधारकास द्यावयाच्या मोबदल्यातून वळती करण्यात आलेला आहे वरील मोबदला मिळकतधारकास दोन हप्त्यात द्यावा लागेल. त्यापैकी 10% मोबदला रूपये 46,530/- खरेदी खताच्या वेळी द्यावा लागेल व उर्वरीत 90% रूपये 4,18,770/- मोबदला संपादीत क्षेत्र महानगरपालिकेचे नांवे पी.आर.कार्डवर नोंद झाल्यानंतर देण्यात येईल.

सबब वरील प्रमाणे मिळकतधारकास मोबदला देण्याबाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मो.जवेद मो.इसहाक : ही जगा कशासाठी खरेदी करीत आहात.

सहा.संचालक नगररचना : सदरील जगा ही शाळेच्या आरक्षणामधील असल्यामूळे शाळेसाठी घेत आहोत.

श्री. रविकांत गवळी : हे आरक्षण केंव्हा ठेवले आहे.आरक्षण क्र. १२३ नगर भूमापन क्रमांक दाखवला आहे. तो पूर्णपणे बाधीत झालेला आहे उक्त क्षेत्र कोणते. ओनर कोण आहे त्याचा उल्लेख नाही.

सहा.संचालक नगररचना : रिवाईजडी. पी. प्रमाणे ठेवले आहे. श्री. पाटणी हे ओनर आहे. एकूण क्षेत्र २६ गुंठे आहे.

मा. सभापती : जगेच्या मालकाचे नाव दर्शविलेले नाही. हा प्रस्ताव सभागृहासमोर दुरूस्तीसह पुन्हा सादर करावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव दुरुस्तीसह पुन्हा सभागृहासमोर सादर करावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.127 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदिराचे आधुनिकीकरण करणेस्तव सा.बां.विभागाच्या सन 2004-05 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.16,67,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा.आयुक्तांनी दि.3-1-2006 अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली असून मा.स्थायी समितीने ठराव क्र.175 दि.10-1-2006 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/निविदा/93/06 दिनांक 4-2-2006 अन्वये निविदा मागविल्या असता श्री.एस.एम.इब्राहीम यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदरील निविदेस स्थायी समिती सभा दि.10-3-2006 ठराव क्र.270 अन्वये मान्यता प्राप्त मिळालेली आहे.

त्यानुसार संत एकनाथ रंगमंदिराचे नुतनीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. सदरील ठिकाणी सुरू असलेल्या कामा संदर्भाने मा.पदाधिकारी व विविध मान्यवरांनी फेरबदल सुचविले आहेत. यामध्ये काही बाबी वगळून त्याऐवजी इतर बाबींचा समावेश करणे व इतर वाढीव कामे विचाराधीन आहेत.

सदरील वाढीव कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.8,78,000/-चे तयार करण्यात आले असून सदरील वाढीव कामासाठी आवश्यक असलेली तरतुद इतर लेखाशिर्षातून वळती करण्याच्या प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.325 अन्वये दि.11-8-2006 रोजी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरील वाढीव कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 8,78,000/- व सदरील वाढीव काम मुळ गुत्तेदार श्री.एस.एम.इब्राहीम यांचेकडून मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिराचे नुतनीकरणाचे कामा संदर्भाने मा.पदाधिकारी व विविध मान्यवरांनी फेरबदल सुचविल्यानुसार काही बाबी वगळून त्याऐवजी इतर बाबींचा समावेश करण्यात आल्याने इतर वाढीव कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.8,78,000/-च्या खर्चास तसेच सदरील वाढीव काम, मुळ गुत्तेदार श्री.एस.एम.इब्राहीम यांचेकडून मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.128 :**

कार्यकारी अभियंता(ज.नि.,वि.इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, केंद्र शासनाच्या सौर संयंत्रे अस्थापीत करण्याच्या योजनेतून औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात सोलार स्ट्रीट लाईट/गार्डन लाईट लावण्याच्या कामाकरीता रक्कम रू.24,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले हाते. त्यास

मा.आयुक्तांनी सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करणेस्तव शिफारस केली होती. सर्वसाधारण सभा ठराव क्र.252/6 दि.20-7-2006 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात सोलार स्ट्रीट/गार्डन लाईट लावण्याच्या कामाकरीता कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/नि/लेखा/15/2006 दि.29-5-2006 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दिवशी सात निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या. त्या दि.14-6-2006 रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या, त्याचा तुलनात्मक तपशील तक्ता खालील प्रमाणे.

1. मे.हायटेक सिस्टीम्स - 11.11% जास्त दराने
2. मे.एस.व्ही.ए.एम.इलेक्ट्रीक्स - 12.00% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.11% जास्त दराची निविदा मे.हायटेक सिटीम्स यांची प्राप्त झालेली आहे. दि.24-8-2006 रोजी मा.आयुक्तांच्या दालनात झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटीअंती अं.प.दरापेक्षा 11.11% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10% जास्त दराने काम करण्यास गुत्तेदाराने सहमती दर्शविलेली आहे.

त्यानुसार मे.हायटेक सिस्टीम्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10% जास्त दराची निविदा स्विकारणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. रविकांत गवळी : या प्रस्तावासंबधी माहिती घेण्यात यावी.

कार्य.अभियंता (विद्यु.) : यात दर्शविलेल्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कम केंद्र शासनाकडून येणार आहे. १२ लक्षचा खर्च महानगरपालिकेचा होणार आहे. या कामासाठी दोन टेंडर आले होते. दरम्यानच्या काळात मंजूरीसाठी वेळ गेला. १० टक्के प्रमाणे करण्यास वाटाघाटी करण्यात आली होती. मेडा ही शासनाची एज्न्सी आहे त्यांचेकडून माहिती घेतली योग्य दर असल्याचे म्हटले आहे. मे हायटेक सिस्टीम यांनी लिहून दिले की सध्या त्यांचेकडे कामाचा व्याप जस्त असल्याने व १२० दिवस झाल्याने ते काम करू शकत नाही. त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाच्या कमी दराचे निविदाधारक मे.एसव्हीएएम इलेक्ट्रीक्स यांना विचारणा केली असता त्यांनी हायटेक सिस्टीम यांच्या ठरलेल्या दराने काम करण्यास तयार असल्यासंबंधी लेखी सम्मती दिली आहे. करीता त्यांचेकडून सदर काम करून घेण्यास मान्यता व्हावी.

मा. सभापती : संबधीत एज्न्सीकडून हे काम त्वरील करून घेण्यात यावे.प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार व सभागृहात झालेल्या चर्चेअंती ठरल्यानुसार केंद्र शासनाच्या सौर संयंत्रे अस्थापीत करण्याच्या योजनेतून औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात सोलार स्ट्रीट लाईट/गार्डन लाईट लावण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक मे.हायटेक सिस्टीम्स यांनी 120 दिवसांपेक्षा जास्त कालावधी झाल्याने काम करण्यास असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे सभागृहात खुलासा केल्यानुसार सदरील काम दुसरे कमी दराचे निविदाधारक मे.एस.व्ही.ए.एम.इलेक्ट्रीक्स यांनी प्रथम क्रमांकाचे कमी दरानुसार काम करण्यास संमती दिल्यानुसार त्यांचेकडून सर्वात कमी दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा 10% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.129 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.जे.एस.बोधनकर, वरीष्ठ लिपिक यांना झालेल्या जीभेच्या कर्करोगाच्या उपचारासाठी कार्यालयातर्फे यापुर्वी कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/882/2006 दि.3-6-2006 अन्वये अग्रीम रक्कम रू.75,000/- व जा.क्र.मनपा/आस्था-1/1465/2006 दि.31-8-2006 अन्वये अग्रीम रू.1,50,000/- मंजूर करण्यात आलेले आहे. संबंधीतास देण्यात आलेले एकत्रित अग्रीम रू.2,25,000/- (अक्षरी दोन लक्ष पंचवीस हजार मात्र) मंजूर करण्याबाबत कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.जे.एस.बोधनकर, वरीष्ठ लिपिक यांना झालेल्या जीभेच्या कर्करोगाच्या उपचारासाठी कार्यालयातर्फे रक्कम रू.75,000/- व रू.1,50,000/- असे देण्यात आलेले एकत्रित अग्रीम रू.2,25,000/- (अक्षरी दोन लक्ष पंचवीस हजार मात्र) च्या रक्कमेस सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.130 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाचा औरंगाबाद महानगरपालिकेला सन 2004-05 सालासाठी राज्य शासनाचा 5 लाखाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे व तो वॉर्ड “फ” ला मिळालेला आहे.

शासन निर्णय क्र.अभियान/पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग प्र.क्र./पा.पु. दि.30-10-2003 नुसार या मिळालेल्या बक्षीसाच्या रक्कमेचा विनियोग करण्याचे पध्दतीनुसार-

- (अ) बक्षीसाच्या रक्कमेपैकी कमाल 2% पर्यंत रू.10,000/- (रूपये दहा हजार फक्त) रक्कम बक्षीस समारंभासाठी आयोजित करावयाच्या कार्यक्रमावर व अनुषंगिक बाबीवर खर्च करता येईल.
- (ब) बक्षीसाच्या रक्कमेच्या 5% पर्यंत रक्कम रू.25,000/- (रूपये पंचवीस हजार फक्त) स्वच्छतेशी निगडीत बाबीच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी संबंधित क्षेत्रात खर्च करता येईल.
- (क) बक्षीसाच्या रक्कमेच्या 5% पर्यंत रक्कम रू.25,000/-(रूपये पंचवीस हजार फक्त) या अभियानाच्या अनुषंगाने संबंधीत क्षेत्रात प्रशासकीय व कार्यालयीन बाबीसाठी खर्च करता येईल.
- (ड) बक्षीसाच्या रक्मेच्या कमाल 15% पर्यंत रक्कम रू.75,000/-(रूपये पंचाहत्तर हजार फक्त) संबंधीत क्षेत्रातील रहिवाश्यांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी खर्च करता येतील असा वैयक्तिक लाभ महिला विद्यार्थी युवक व नागरी स्वच्छता योजनेत उत्कृष्ट काम करणाऱ्या नागरीकांना देण्याचा निर्णय स्थायी समिती घेऊ शकेल. वैयक्तिक लाभाच्या योजनेत नागरी स्वच्छतेशी निगडीत बाबी जशा की, पिण्याचे पाणी शुध्दता तपासणी उपकरणे पुरविणे, सफाई उपकरणे, नागरी सुविधासाठी आवश्यक वस्तू अशा तत्सम स्वरूपाचे असावे. शक्यतो वैयक्तिक लाभ रोख रक्कमेत देण्याचे टाळावे. रोख रक्कम देण्याचा निर्णय स्थायी समितीने घेतल्यास तो एकूण 15% मर्यादेच्या आंत व प्रति लाभार्थी रू.300/- पेक्षा जास्त असू नये.
- (इ) उर्वरीत रक्कम रू.3,65,000/-(रूपये तीन लाख पासष्ट हजार फक्त) संबंधीत क्षेत्रातील स्वच्छतेशी निगडीत सार्वजनिक कामाकरीता खर्च करण्यात यावी. यात पाणी शुध्दता तपासणी उपकरणे, किटकनाशके खरेदी, ड्रेनेज, कचरा कुंड्या, वृक्षारोपण, पाणी स्त्रोत स्वच्छता, सार्वजनिक शौचालय बांधकाम/दुरूस्ती/देखभाल इ. तत्सम बाबीचा समावेश करता येईल.

सदरील प्रस्ताव स्थायी समितीपुढे मार्गदर्शनासाठी, चर्चेसाठी व निर्णयासाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाचा औरंगाबाद महानगरपालिकेला वॉर्ड “फ” ला सन 2004-05 सालासाठी राज्य शासनाकडून मिळालेल्या 5 लाखाचे पुरस्कारातून शासन

निर्णय क्र.अभियान/पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग प्र.क्र./पा.पु. दि.30-10-2003 नुसार या मिळालेल्या बक्षीसाच्या रक्कमेचा विनियोग करण्याचे पध्दतीनुसार कामांवर सदरील रक्कमेचा विनियोग करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.131 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्र.क्र.85 लक्ष्मीनगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे करीता रक्कम रू.3,97,359/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/नि/75/05 दि.21.12.2005 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 10 निविदा विक्री झाल्या होत्या व निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकूण 6 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या असता सर्वात कमी दराची निविदा म्हणजेच अं.प.दरापेक्षा 0.25% कमी दराची निविदा श्री.विजय मालोदे यांची प्राप्त झालेली होती. तथापि दराबाबतच्या वाटाघाटीअंती अं.प.दरापेक्षा 2% कमी दराने सदरील निविदेस मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरील काम प्रगती पथावर असून त्या कामामध्ये स.नगरसेवक यांनी काही फेरबदल सुचविले असून त्यानुसार वाढीव काम करणे करीता रक्कम रू.2.50 लक्ष इतर लेखा शिर्षातून वळती करणेस्तव सर्वसाधारण सभेने दि.17/8/2006 रोजी (दि.11/8/06 ची तहकुब सभा) संपन्न झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली आहे.

सदरील वाढीव कामास रक्कम रू.2,49,388/- ची आवश्यकता असून सदरील वाढीव काम मुळ गुत्तेदाराकडून मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा 2% कमी दराने करून घेण्यास मान्यतेस्तव सादर केले असता मा.आयुक्तांनी स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस केली आहे.

त्यानुसार सदरील वाढीव काम मुळ गुत्तेदाराकडून मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा 2% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्र.क्र.85 लक्ष्मीनगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामामध्ये रक्कम रू.2,49,388/- च्या वाढीव कमास व सदरील वाढीव काम मुळ गुत्तेदार श्री.विजय मालोदे यांचेकडून मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा 2% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.132 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.93 वेदांतनगर अंतर्गत रस्त्यालगत फुटपाथ बांधणेच्या कामासाठी सा.बां.विभागाची दरसूची सन 2005-2006 अन्वये र.रू.19,63,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मा.आयुक्तांची मान्यता प्राप्त झालेली आहे. या कामाचा खर्च खालील प्रमाणे उपलब्ध तरतुदी मधून प्रस्तावित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | सर्वसाधारण सभा ठराव क्र.315/35 दि.11.8.2006 अन्वये या कामासाठी उपलब्ध तरतूद | - | 15.00 लाख |
| 2. | अर्थसंकल्प 2006-07 मधील पृष्ठ क्र.W177 वरील या कामासाठी उपलब्ध तरतुद | - | 05.00 लाख |
| | एकूण | - | 20.00 लाख |

सदरील कामात अस्तित्वातील फुटपाथवर बसविलेले आर.सी.सी.ढापे काढून त्याऐवजी पेव्हींग ब्लॉक बसविणे, कर्बींग करणे इत्यादी कामांचा समावेश असून अंदजपत्रक मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.93 वेदांतनगर अंतर्गत रस्त्यालगत फुटपाथ बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.19,63,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.133 :**

प्रभारी मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/११०६/प्र.क्र.१९/सेवा-९ मंत्रालय, मुंबई दि.४ ऑक्टोबर २००६ नुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दि.१ सप्टेंबर २००६ महागाई भत्ता वाढ ५% मंजुर केलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दि.१.९.२००६ पासून महागाई भत्ता २४% ऐवजे २९% अदा करण्यासाठी प्रती माह रू.११.९७ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात वेतन व भत्ते अदा करण्यासाठी स्वतंत्र तरतुद करण्यात आलेली आहे. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना ऑक्टोबर २००६ च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात २४% ऐवजे २९% महागाई भत्ता समाविष्ट करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मो.जवेद मो.इसहाक : प्रस्तावात मुख्यलेखाधिकारी यानी प्रस्ताव सादर केला आहे की असे नमूद केले मुख्यलेखाधिकारी कोण आहे.

प्र.आयुक्त : मुख्यलेखाधिकारी महेद्र खैरनार यांचे निधना नंतर मुख्यलेखाधिकारी पदाचा चार्ज लेखाधिकारी श्री. संजय पवार यांचे कडे अतिरिक्त चार्जदेण्यात आलेला आहे.

मा. सभापती : दुरूस्ती करून हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक 1-9-2006 पासून 24% ऐवजी 29% महागाई भत्ता अदा करण्यास, तसेच ऑक्टोबर 2006 च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात वाढीव महागाई भत्ता समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.134 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील खेळणी 20 वर्षापुर्वी बसविण्यात आली होती. वेळोवेळी दुरूस्ती करून आतापर्यंत उपयोगात आणण्यात आली. आता त्या जागेवर नवीन खेळणी बसविण्याकरीता रक्कम रू.15,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

सदरील कामाकरीता निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/09/2006 दि.19-6-2006 अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता तीन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | स्काय इंटरप्रायजेस | - | 9.9% जास्त दराने |
| 2. | ओम साई ग्लास फायबर्स | - | 14.30% जास्त दराने |
| 3. | ग्लास फायबर इंडस्ट्रीज | - | 16% जास्त दराने |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री स्काय इंटरप्रायजेस यांची आहे. श्री.स्काय इंटरप्रायजेस यांना वाटाघाटीसाठी बोलावले असता सदर ठेकेदारानी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास संमती दिली आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथील जुनी खेळणी बदलून त्या जागेवर नवीन खेळणी बसविण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री स्काय इंटरप्रायजेस यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.135 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, व्यंकटेश मंगल कार्यालय गारखेडा ते शिवाजीनगर रेल्वे क्रॉसिंग पर्यंत 24 मी. रूंद रस्त्याची सुधारणा करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.2,58,29,700/- चे असून या कामासाठी निविदा मागविल्या असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | ए. सी. कोठारी | 21.21% जास्त |
| 2 | के. बी. पाथ्रीकर | 25.21% जास्त |
| 3 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 32.50% जास्त |
| 4 | एम. ए. सिद्यीकी | 40% जास्त |

प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा ए.सी.कोठारी यांची असून त्यांचा निविदा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.21% जास्त दराने आहे.

तरी ए.सी.कोठारी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.21% (एकवीस पॉइंट दोन एक टक्के) जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मो.जवेद मो.इसहाक : या कामात रिंग झालेली आहे. काम विभागून घेतलेले आहे. पुन्हा टेंडर काढण्यात यावे अशी विनंती आहे.

श्री. रविकांत गवळी : शासनाकडून मराठवाडा विकास पॅकेजअंतर्गत जे १२ रस्ते तयार करायचे होते त्यात हे चार पाच रस्ते आलेले आहे. जे दर ठेवलेले आहे ते डीएसआर नूसार आहे का जस्तीचे वाटतात.

अति.शहर अभियंता :शहर अभियंता यांनी चार प्रस्ताव रस्त्याचे ठेवलेले आहे. मागिल वर्षी शासनाने जे २५ कोटी दिले त्यातून हे रस्ते करण्याचे प्रस्तावित आहे. आतापर्यत २५ कोटीतून काहीही खर्च केलेला नाही. शासनाकडून सारखी विचारणा केली जत आहे. या वर्षी हा खर्च होणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रस्तावात दर हे स्पर्धात्मक आहेत. यात रिंग वगैरे झालेली नाही. मुळ अंदाजत्रकामध्ये डांबराचे दर हे १२,८०० एवढे होते आता २५,००० हजर मॅट्रीक टन असा झालेले आहे. त्यामूळे हे दर वाढी आलेले आहे.

श्री. त्र्यबंक तुपे : शासनाचा निधी आहे. वर्षभरात कोणतेही काम केले जत नाही. हे बरोबर नाही. जी कामे महानगरपालिकेची होणार आहे त्यास एक एक वर्ष लागणार आहे का ?

श्री. रविकांत गवळी : चार रस्त्याचे प्रस्ताव आलेले आहे ते मंजूर करण्यात यावे परंतू आणखी काही रस्त्याच्या बाबतीत भुसंपादनाचा प्रश्न आहे तो तात्काळ सोडवून त्या ही रस्त्याची कामे हाती घेण्याची कार्यवाही करावी.

मा. सभापती : विषय क्र १३५ ते १३९ मंजूर करण्यात येते आहे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व्यंकटेश मंगल कार्यालय गारखेडा ते शिवाजीनगर रेल्वे क्रॉसिंग पर्यंत 24 मी. रूंद रस्त्याची सुधारणा करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.21%(एकवीस पॉइंट दोन एक टक्के) जास्त दराची ए.सी. कोठारी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.136 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, सेव्हनहिल चौक ते गजानन महाराज मंदिर आणि डॉ.सावजी हॉस्पीटल ते व्यंकटेश मंगल कार्यालय या 30 मी. रूंद विकास योजना रस्त्याची सुधारणा करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.3,14,54,065/- चे असून या कामासाठी निविदा मागविल्या असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 29% जास्त |
| 2 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 32.30% जास्त |
| 3 | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 35% जास्त |
| 4 | एम. ए. सिद्यीकी | 36% जास्त |

प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची असून त्यांचा निविदा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29%(एकोणतीस टक्के) जास्त दराने आहे. कंत्राटदाराने भरलेला निविदा दर जास्त असल्याने कंत्राटदाराला दर कमी करण्यासाठी वाटाघाटीस बोलाविले असता मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांनी अं.प.दरापेक्षा 22%(बावीस टक्के) जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे.

तरी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22% (बावीस टक्के) जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सेव्हनहिल चौक ते गजानन महाराज मंदिर आणि डॉ.सावजी हॉस्पीटल ते व्यंकटेश मंगल कार्यालय या 30 मी. रूंद विकास योजना रस्त्याची सुधारणा करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22% (बावीस टक्के) जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.137 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, बीड बायपास ते शहासोक्ता दर्गा व रेल्वेस्टेशन उड्डाणपुल ते दै.तरूण भारत पर्यंत 24 मी.रूंद रस्त्याची सुधारणा करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.3,49,70,617/- चे असून या कामासाठी निविदा मागविल्या असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 29.89% जास्त |
| 2 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 32.3% जास्त |
| 3 | एम. ए. सिद्यीकी | 36.86% जास्त |
| 4 | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 38% जास्त |

प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची असून त्यांचा निविदा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29.89% जास्त दराने आहे. कंत्राटदाराने भरलेला निविदा दर जास्त असल्याने कंत्राटदाराला दर कमी करण्यासाठी वाटाघाटीस बोलाविले असता आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांनी अं.प.दरापेक्षा 22%(बावीस टक्के) जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे.

तरी आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22% (बावीस टक्के) जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बीड बायपास ते शहासोक्ता दर्गा व रेल्वेस्टेशन उड्डाणपुल ते दै.तरूण भारत पर्यंत 24 मी.रूंद रस्त्याची सुधारणा करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22% (बावीस टक्के)जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.138 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, सिल्लेखाना ते लक्ष्मण चावडी पर्यंत 24 मी. रूंद विकास योजना रस्त्याची सुधारणा करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.2,08,87,800/- चे असून या कामासाठी निविदा मागविल्या असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | एम. ए. सिद्यीकी | 29.86% जास्त |
| 2 | अरोरा कन्स्ट्रक्शन | 30.12% जास्त |
| 3 | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 30.82% जास्त |
| 4 | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 35% जास्त |

प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा एम. ए. सिद्यीकी यांची असून त्यांचा निविदा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 29.86% जास्त दराने आहे. कंत्राटदाराने भरलेला निविदा दर जास्त असल्याने कंत्राटदाराला दर कमी करण्यासाठी वाटाघाटीस बोलाविले असता एम.ए.सिद्यीकी यांनी अं.प.दरापेक्षा 22%(बावीस टक्के) जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे.

तरी एम.ए.सिद्यीकी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22% (बावीस टक्के) जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्लेखाना ते लक्ष्मण चावडी पर्यंत 24 मी. रूंद विकास योजना रस्त्याची सुधारणा करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम एम.ए.सिद्यीकी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22%(बावीस टक्के) जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.139 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिनांक 9 डिसेंबर ते 13 डिसेंबर जगत गुरू नरेंद्र महाराज यांचे प्रवचन व दर्शन सोहळा या धार्मिक कार्यक्रमास मनपा गरवारे क्रिडा संकुल भाडे तत्वावर मा.खा.श्री.चंद्रकांतजी खैरे यांचे नांवे देणे करीता श्री.शिवाजी इंजे पाटील यांनी मागणी केलेली आहे. त्यानुसार सदरील क्रिडा संकुल प्रति दिन 1000/- रू. दराने मा.आयुक्त यांच्याकडे सादर केले असता मा.स्थायी समितीकडे सादर करणे बाबत आदेशीत केलेले आहे.

त्यानुसार दिनांक 9 डिसेंबर ते 13 डिसेंबर जगत गुरू नरेंद्र महाराज यांचे प्रवचन व दर्शन सोहळा या धार्मिक कार्यक्रमास मनपा गरवारे क्रिडा संकुल प्रति दिन 1000/- रू.प्रमाणे भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक 9 डिसेंबर ते 13 डिसेंबर जगतगुरू नरेंद्र महाराज यांचे प्रवचन व दर्शन सोहळा या धार्मिक कार्यक्रमास **मनपा गरवारे क्रिडा संकुल** प्रति दिन 1000/- रू.प्रमाणे भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.140 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिनांक 16 डिसेंबर 2006 रोजी मा.आ.श्री.संदिपान भुमरे यांनी, मुलीचे लग्नाकरीता मनपा गरवारे क्रिडा संकुल एक दिवसाकरीता भाडे तत्वावर देण्यासाठी मागणी केलेली आहे. त्यानुसार मान्यतेस्तव मा.आयुक्त यांच्याकडे सादर केले असता मा.आयुक्तांनी गरवारे क्रिडा संकुलाच्या परिसराची व्याप्ती पाहता एक दिवसाचे भाडे रक्कम रू.1,00,000/- अधिक विद्युत देयक, पाण्याचे देयक व साफसफाई इत्यादी दर लावून मान्यतेस्तव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस्तव आदेशीत केलेले आहे.

त्यानुसार दिनांक 16 डिसेंबर 2006 रोजी मा.आ.श्री.संदिपान भुमरे यांच्या मुलीच्या लग्नाकरीता मनपाचे गरवारे क्रिडा संकुल, एक दिवसाकरीता रक्कम रू.1,00,000/- अधिक विद्युत देयक, पाण्याचे देयक व साफसफाई इत्यादी दर लावून भाडेतत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : एका प्रस्तावात गरवारे स्टेडीयमचे भाडे 1000/- व दुसऱ्या प्रस्तावात 1 लाख कशासाठी. दोन्ही साठी सारखे भाडे आकारण्यात यावे.

मा. सभापती : प्रस्ताव क्र.139 मध्ये 1000/- भाडे दर्शविलेले आहे. प्रस्ताव क्र.140 मध्ये लग्न समारंभासाठी द्यावयाचे असल्यामुळे रू.5000/- एकत्रित भाडे आकारण्यात यावे. त्याप्रमाणे प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिनांक 16 डिसेंबर 2006 रोजी मा.आ.श्री.संदिपान भुमरे यांच्या मुलीच्या लग्नाकरीता मनपाचे गरवारे क्रिडा संकुल, एक दिवसाकरीता प्रतिदिन रू.5000/- एकत्रित भाडे आकारणी करून भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.141 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला की, टाऊन हॉल येथील मनपाच्या ऐतिहासिक इमारतीचे सौंदर्यीकरण व सुशोभिकरण करण्याच्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे, डिझाईन, नकाशे व कामावर देखरेख करण्याकरीता वास्तुविशारद श्री.अब्राहम पॅथरोस यांची नियुक्ती

करण्यात आली असून सदरील काम त्यांच्याकडून अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.5% दराने करणेस्तव मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदरील काम वास्तु विशारद श्री.अब्राहम पॅथरोस यांचेकडून अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.5% दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

सौ. लता दलाल : या प्रस्तावाच्या अनुषंगाने वास्तुविशारद व वास्तु तज्ञ यांचे एक पॅनल नियुक्त केलेले असतात त्याची यादी समोर यावी.

मा. सभापती : यापुर्वी दिलेल्या सूचनेप्रमाणे वास्तुविशारद यांचे कमीत कमी पाच लोकांचे पॅनल तयार करावे, पाच लोकांना ड्रॉईंग काढण्याचे सांगावे, ज्याचे मान्य होईल त्यांना १.५% देण्यात यावे. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊन हॉल येथील मनपाच्या ऐतिहासिक इमारतीचे सौंदर्यीकरण व सुशोभिकरण करण्याच्या कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे, डिझाईन, नकाशे व कामावर देखरेख करण्याचे काम वास्तुविशारद श्री.अब्राहम पॅथरोस यांच्याकडून अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.5% दराने करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार यापुढे वास्तुतज्ञांचे एक पॅनल नियुक्त करावे, त्यांचेकडून ड्रॉइंग मागवून त्यातून ज्यांचे मान्य होईल त्यांचेकडून अशा प्रकारचे काम करून घेण्याची कार्यवाही अनुसरण्यात यावी.

**विषय क्र.142 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला की, मुख्य अग्निशमन दल, पदमपुरा येथील अस्तित्वातील इमारतीवर आपत्कालीन व्यवस्थापन अंतर्गत अतिरिक्त मजल्यांची वाढ करणे या कामास्तव आवश्यक असलेले अंदाजपत्रक, नकाशे व स्ट्रक्चरल डिझाईन इत्यादी तयार करणे करीता एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.50% फिस अदा करून श्री.मनिष काळे अँड असोसिएट्स यांना सदरील काम मा.स्थायी समिती सभेची मान्यता दि.31.3.2006 ठराव क्र.333 अन्वये देण्यात आले होते. परंतु त्यांनी सदरील काम करण्यास नकार दिला असल्या कारणाने त्याच दरात म्हणजेच अं.प.रक्कमेच्या 1.50% दराने वास्तु विशारद श्री.एन.आर.वर्मा यांचेकडून करून घेणेस्तव सादर केले असता मा.आयुक्तांनी स्थायी समितीकडे सादर करण्यास आदेशीत केले आहे.

त्यानुसार सदरील काम वास्तु विशारद श्री.एन.आर.वर्मा यांचेकडून अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.50% दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुख्य अग्निशमन दल, पदमपुरा येथील अस्तित्वातील इमारतीवर आपत्कालीन व्यवस्थापन अंतर्गत अतिरिक्त मजल्यांची वाढ करणे या कामास्तव आवश्यक असलेले अंदाजपत्रक, नकाशे व स्ट्रक्चरल डिझाईन इत्यादी तयार करणे करीता श्री.मनिष काळे अँड असोसिएट्स यांनी काम करण्यास नकार दिल्यामुळे सदरील काम वास्तु विशारद श्री.एन.आर.वर्मा यांचेकडून अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.5% दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार यापुढे वास्तुतज्ञांचे एक पॅनल नियुक्त करावे, त्यांचेकडून ड्रॉइंग मागवून त्यातून ज्यांचे मान्य होईल त्यांचेकडून अशा प्रकारचे काम करून घेण्याची कार्यवाही अनुसरण्यात यावी.

**विषय क्र.143 :**

**(दि.16-8-2006 रोजी स्थायी समिती सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव-विषय क्र.78 )**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, दमडीमहल येथे 100' रूंद विकास योजना रस्त्यावर पुल बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.79,00,000/- चे असून या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण 6 निविदा विक्री झाल्या व दर भरलेल्या एकूण 5 निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| 1. श्री. ए.सी. शेख | अं.प.दरापेक्षा 13.76% कमी दराने |
| 2. मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 9.786% कमी दराने |
| 3. मे. अन्सारी कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 8.01% कमी दराने |
| 4. मे. राणा कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 7.787% कमी दराने |
| 5. मे. एलोरा कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 4.21% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री. ए.सी. शेख यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.76% कमी दराने आहे. सदर निविदेस मा.आयुक्तांनी शिफारस करून मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केलेले आहे. सद्यःस्थितीत भूसंपादन करण्याची वेगळी समांतर कार्यवाही चालू आहे.

तरी श्री.ए.सी. शेख यांची अं.प.दरापेक्षा 13.76% कमी दराची निविदा मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा. सभापती : १५ दिवसाच्या आत या कामास सुरूवात होईल अशा सूचना संबधीत ठेकेदारास देण्यात याव्यात. हे काम त्वरीत सुरू करावे, मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दमडीमहल येथे 100' रूंद विकास योजना रस्त्यावर पुल बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 13.76% कमी दराची श्री.ए.सी.शेख यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.144 :**

प्रस्ताव सादर करणेत येतो की, महिला व बाल कल्याण समितीचे वतीने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे या दृष्टीने पिको फॉल शिवणयंत्र वाटप करण्याबाबत महिला व बाल कल्याण समितीने विषय क्र.6 दि.14-7-2006 रोजी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार आय.एस.आय. मार्क पिको फॉल शिवणयंत्र खरेदीसाठी जा.क्र.मनपा/मबाकस/2006/100, दि.7-8-2006 रोजी जाहीर निविदा दै.लोकमत, सकाळ, सामना या वृत्तपत्रातून प्रकाशित करणेत आली होती. अंतिम दिनांकापर्यंत एकूण चार निविदांची विक्री झाली व निविदा सादर करणेचे अंतिम दिनांकापर्यंत एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. निविदाधारकांनी सादर केलेले दर खालील प्रमाणे.

1. **रवि इन्टरप्रायजेस,** रू. 4,900/-
   लक्ष्मी पिको फॉल शिवणयंत्र आयएसआय मार्क, इलेक्ट्रीक
   मोटर फिटींग आणि 18'x36' च्या टेबल व स्टँडसह
2. **कविता एन्टरप्रायजेस,** रू. 7,897/-
   उषा पिको फॉल शिवणयंत्र 151, इलेक्ट्रीक
   मोटर सह संपूर्ण सेट
3. **के.सी.सुर्यवंशी ॲण्ड कं.,** रू. 4,777/-
   आयएसआय मार्क पिको फॉल शिवणयंत्र, इलेक्ट्रीक
   मोटर व 18'x36' टेबल स्टँडसह

प्राप्त निविदा दरांमध्ये के.सी.सुर्यवंशी यांनी सादर केलेले दर तुलनात्मकदृष्ट्या कमी आहेत. या संदर्भात मुख्य लेखाधिकारी यांनी संबंधीत निविदा धारकांशी केलेल्या वाटाघाटी अंती प्राप्त निविदा दरामध्ये 5% दर कमी करून पुरवठा करण्याचे संबंधीत निविदाधारकाने मान्य केले आहे. महिला व बाल कल्याण समितीच्या सन 2006-07 च्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या एकूण 15% खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

तरी उपरोक्त नुसार निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार एकूण 309 आयएसआय मार्क पिको फॉल शिवणयंत्र खरेदी करण्यासाठी येणाऱ्या रू.14,02,242/- च्या खर्चास व पिको फॉल शिवणयंत्र खरेदीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे या दृष्टीने पिको फॉल शिवणयंत्र वाटप करण्याकरीता, आय.एस.आय. मार्क पिको फॉल शिवणयंत्र खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक के.सी.सुर्यवंशी अँड कं. यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार प्राप्त निविदा दरामध्ये 5% दर कमी करून एकूण 309 आयएसआय मार्क पिको फॉल शिवणयंत्र, **के.सी.सुर्यवंशी अँड कं.** यांचेकडून खरेदी करण्यास तसेच यासाठी लागणाऱ्या रक्कम रू.**14,02,242**/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>संवाद :</u>**

श्री. रविकांत गवळी : लाईनमन याचे चुकामूळे त्याची एक वर्षासाठी वेतनवाढ रोखलेली होती.त्यांनी त्याची चूक मान्य केलेली असून यापूढे चूक होणार नाही असे लेखी दिले आहे. त्यांचे अपील आपल्याकडे आलेले आहे. त्यास मान्यता दयावी.

मा. सभापती : यापूढे त्या कर्मचाऱ्याकडून चूका होवू नये याची काळजी त्यांनी घ्यावी. अपील मंजूर करण्यात येते.

**<u>विषय क्र.145 :</u>**

श्री.जनार्दन शामराव वाघ, लाईनमन, विद्युत विभाग यांनी त्यांची एक वार्षिक वेतनवाढ रोखण्याच्या आदेशाविरूध्द (आदेश क्र.मनपा/आस्था-2/2006/691, दि.28-8-2006) सादर केलेल्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**<u>ठराव :</u>**

श्री.जनार्दन शामराव वाघ, लाईनमन, विद्युत विभाग यांनी स्थायी समितीकडे सादर केलेले अपील मंजूर करण्यात येते. प्रस्तावात नमूद दि.27-8-2006 च्या आदेशान्वये त्यांची रोखण्यात आलेली एक वार्षिक वेतनवाढ पुर्ववत सुरू करण्यास मंजुरी देण्यात येते. यापुढे संबंधीत कर्मचाऱ्याने कार्यालयीन कामामध्ये शिस्तभंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद